# भुयारी मेट्रो ३ : प्रकल्पाचे काम ७० टक्के पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून कुलाबा-वांद्रे- सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम वेगाने सुरू आहे. या संपूर्ण प्रकल्पाचे काम ७० टक्के पूर्ण झाल्याचा दावा कॉर्पोरेशनने केला. महत्त्वाचे म्हणजे भुयारी मेट्रोचे काम वेगाने पूर्ण होत असतानाच या मार्गाच्या कारशेडचा मुद्दा अजूनही अधांतरीच असून, भुयारी मेट्रो - ३ चे कारशेड कुठे, हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ च्या कामाचा आढावा घेतला. यावेळी पूर्ण झालेल्या संपूर्ण नागरी कामांची टक्केवारी ८१ आहे. स्थानकांचे काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. ४२ पैकी ४० ब्रेक थ्रू पूर्ण झाले आहेत. तर भुयारीकरणाच्या कामाचा टक्का ९७ आहे.